International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# महिला सबलीकरण : आव्हाने आणि उपाय

**प्रा. रंजन एम. चव्हाण**
*सहयोगी प्राध्यापक*
*गुलाम नबी आझाद समाजकार्य महाविद्यालय, पुसद जि. यवतमाळ*
***Corresponding Author – प्रा. रंजन एम. चव्हाण***
**DOI - 10.5281/zenodo.15245375**

**प्रस्तावना :**

जगातील सर्व देशांमध्ये स्त्री हा घटक उपेक्षित राहत आला आहे. अगदी 20 व्या शतकापर्यंत स्त्री-मुक्ती सबलीकरणाकडे कोणी गांभीर्याने पाहिले नाही, परंतु 20 व्या शतकाच्या शेवटच्या दशकात मात्र हा प्रश्न सार्वत्रिक आस्थेचा बनला. कुटुंबात आणि समाजात पुरुषापेक्षा अधिक श्रम करुनही स्त्रियांचा दुय्यम दर्जा सर्वत्र दिसून येतो. संपूर्ण आयुष्यभर स्वताःचा विचार न करता निःस्पृहतेने जगूनही स्त्रियांना कुटुंबात, समाजात कामाच्या ठिकाणी सतत अन्याय अत्याचार सहन करावा लागतो. युनोच्या पुढाकाराने इ.स. 1975 से 1985 हे स्त्री दशक जाहीर झाले. स्त्री दशकांच्या निमित्ताने या विषयावर सर्व देशातून चर्चा होऊ लागली. स्त्रीयांचे प्रश्न जागतीक पातळीच्या ऐरणीवर आले. येथुनच स्त्री जीवनाची नवीपहाट उगवली असे म्हणावयास हरकत नाही. जो पर्यंत महिला सबल होणार नाही तो पर्यंत तिला आपल्या हक्काची जाणीव होणार नाही. म्हणून महिला सबल होणे गरजेचे आहे. महिला या देशाचे भविष्य ठरवणारी शक्ती आहे त्यामुळे ही शक्ती सुदृढ व सक्षम बनविणे ही समाजाची जबाबदारी आहे.

आपल्या देशाची अधिक लोकसंख्या ही महिलांची आहे. या लोकसंख्येसाठी सरकारद्वारे मातृदिवस, महिला दिन, बालिकादिन, जननीसुरक्षा अभियान असे कार्यक्रम राबविले जातात. त्यामुळे समाजात स्त्री शक्तीचे महत्व व अधिकार जागृत करण्याचे काम केले जाते. पण या सोबत आज महिला सबलीकरण करताना सर्वप्रथम समाजात महिलांचे अधिकार व मुल्य याच्यांवर घात करणार या विघातक प्रवृत्ती अर्थात हुंडा प्रथा, स्त्री-भृण हत्या, निरक्षरता, लैगिक अत्याचार, असमानता इत्यादीचा नाश करणे गरजेचे आहे. लैंगिक भेदभाव नष्ट करुन समानता प्रस्थापित करणे, तसेच समाजिक, घरगुती अन्याय व अत्याचार, असमानता इत्यादीचा नाश करणे गरजेचे आहे. यांच्याविरुध्द कठोर कायदे व उपाययोजना करणे, त्याच बरोबर महिलांना शारीरिक, सामाजिक, आर्थिक व मानसिक स्वरुपात सशक्त बनविणे ही समाजाची जबाबदारी आहे. अशा प्रकारे महिला सबलीकरण करणे म्हणजे पुरुषांना हिणवणे किया त्यांच्या पेक्षा श्रेष्ठता सिध्द करणे, असे नव्हे, तर फक्त महिलांना त्यांच्या नैसर्गिक गुणधर्म, समता, परंपरा यांच्या सह समानतेने वागविणे होय. असा विचारप्रवाह समाजात प्रस्थापित झाला तर, ख-या अर्थाने महिलांचे सबलीकरण होईल स्त्रीशक्तीच्या रुपात देशात असलेले मनुष्यबळ विकसीत करुन स्त्रीशक्तीचे आरोग्य, शिक्षण, संस्कार व स्वावलंबन हे चार आधारस्तंभ समाजाने भक्कम केले तर समाजात सुराज्य व स्वराज्य दिसेल आणि फक्त अभिमानापुरते कागदोपत्री नाही, तर वास्तव्यात महिला सबलीकरण झालेले असेल. आपल्या भारत देशाला पूर्ण विकसीत बनवण्यासाठी व

परिपूर्ण विकासाचे लक्ष्य पुर्ण करण्यासाठी महिला सबलीकरण महत्वाचे ठरले.

**उद्दिष्टे:**

1. स्त्री-पुरुष समानतेवर आधारित व्यवस्थेची निर्मिती
2. स्त्रीयांवरील अन्याय व अत्याचार दूर करणे.
3. स्त्रियांना रोजगार भिमुख बनविणे.
4. स्त्रियांचा मानसिक आणि बौध्दिक विकास करणे.
5. स्त्रियांना आर्थिक आणि सामाजिक न्याय मिळवून देणे
6. स्त्रियांचे खच्चीकरण थांबविणे.
7. राजकिय निर्णय प्रक्रियेत महिलांचा सहभाग वाढविणे
8. सर्वच क्षेत्रात महिलांना समान संधी

**आव्हाने :**

स्त्रियांच्या गेल्या पन्नास वर्षात झालेली प्रगती व वेगवेगळ्या क्षेत्रात घेतलेली झेप ही समस्त समाजास अभिमानास्पद वाटावी, अशी कामगिरी आहे. स्त्री जागी झाल्याने, तिला आत्मभान आल्याने व तिला तिची अस्मिता गवसल्याने ती पारंपारिक वर्तन चौकटीना नाकारते आहे. ज्या गतीने आजची स्त्री बदलली आहे व बदलत आहे. त्यागतीने पुरुष व समाज बदललेला नाही. त्यामुळे आजच्या स्त्रियांना नव्या ताणतणावांना तोंड द्यावे लागत आहे. आपल्या अस्मितेसाठी आपल्या हक्कासाठी लढा द्यायला सज्ज झालेल्या या स्त्रीयापुढे अनेक आव्हाने आहेत ते पुढील प्रमाणे

**1. पुरुष मानसिकता:** स्त्रिया कितीही शिकल्या कोणत्याही राजकीय, सामाजिक, शैक्षणिक उच्चपदस्थ असल्यातरी त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. पुरुष आजही ही एक दुय्यम व्यक्तीमत्व म्हणून पाहतात. जो पर्यंत पुरुषांची हि मानसिकता बदलणार नाही तो पर्यंत स्त्री-पुरुष समानता येणार नाही

**2. सामाजिक रुढी परंपरा:** देशाच्या अनेक भागात आजही बाल विवाहाची प्रथा, पुत्रप्राप्तीशिवाय मोक्ष प्राप्ती नाही. अशा भ्रमक कल्पनेमुळे मुलींचा जन्म नाकारला जातो. स्त्रीयांवर सक्तीचे गर्भारपण लादले जाते. यातून स्त्रीयांचे आरोग्य व मानसिक खच्चिकरण होते.

**3. स्त्रीकडे पाहण्याचा भोगवादी दृष्टीकोन:** आजही स्त्री ही उपभोगाची वस्तू आहे. या दृष्टीने समाज तिच्याकडे पाहतो. आजही मूल जन्माला घालणारी मशीन म्हणून तिच्याकडे बघण्यात येते. कोणत्या स्त्रीने किती मुले जन्माला घालावीत याचा अधिकार देखील पुरुषसत्ताक व्यवस्थेने हिरावून घेतला आहे आणि जो पर्यंत या सर्व गोष्टीकडे गांभिर्याने बघितले जात नाही. तो पर्यंत स्त्री कडे पाहण्याचा दृष्टीकोन बदलणार नाही.

**4. शिक्षणाचा अभाव:** आजही भारतातील बहुसंख्य स्त्रिया निरक्षर आहेत. त्या आपले जीवन अत्यंत हालाखीत जगत आहेत. ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी स्त्रियांच्या शिक्षणाची मुहर्त मेड रोवली. त्यामुळे स्त्रिया शिकायला लागल्या. आज स्त्री प्रत्येक क्षेत्रात पुढे येत आहे परंतु कमी प्रमाणात.

**5. हुंडाबळी व एकतर्फी प्रेम:** हुंडाबळी आणि एकतर्फी प्रेमातून स्त्रियांचे राजरोश खून पाडले जातात. याचा सरळ अर्थ असा की पुरुषसत्ताक व्यवस्थेत भरण पोषणासाठी स्त्रियांचा वापर करायचा आणि गरज नसेल तर तिचा जगण्याचा अधिकारच नाकारायचा अशी पुरुषसत्ताक व्यवस्थेची सरळ भूमिका आहे.

**6. स्त्री नाते संबंध:** स्त्रियांच्या प्रगतीआड पुरुष तर आहेतच. पण पुरुषसत्ताक व्यवस्थेने निर्माण केलेले स्त्री नाते संबंध देखील त्याला जबाबदार आहेत सासू-सुनेचे नाते. ननंद-जावा यांचे नाते एवढेच नव्हे तर मुलगा व मुलगी याला भेदभाव करणारी आई हि याला जबाबदार आहे.

**7. लैंगिक अत्याचार:** महिनावर होणाऱ्या लैंगिक अत्याचारावर दिवसांदवस वाढ होत आहे. ग्रामीण अडाणी मालक मजूर स्त्रियांवर अत्याचार करतात.

तसेच शहरी उच्च पदस्थ अधिकारी सध्या सत्तेच्या बळावर स्त्रियांचे लैंगिक शोषण करतात.

**८. बालविवाह:** बालविवाह प्रतिबंधक कायदा करुनही आज देशात मोठया प्रमाणात बालविवाह होत असलेले दिसून येतात. त्यामुळे स्त्रियांचे शारीरिक व मानसीक खच्चीकरण होते.

**९. मानसिक खच्चीकरण:** स्त्रियांना समाजात मिळणारी वागणूक त्याचप्रमाणे घरातील कोणत्याही निर्णय प्रक्रियेत तिचा समावेश केला जात नाही. घरात केला जाणारा स्त्री आणि पुरुष असा भेदभाव यामुळे स्त्रियांचे मानसिक खच्चीकरण होते.

अशा स्वरुपाचे अनेक आव्हाने महिला समोर आहे.

**उपाय :**

**1. बालिका समृध्दी योजना:** लहानपणापासून मुलीचे सक्षमीकरण करण्यासाठी शासनाच्या विविध योजना आहेत. या वेगवेगळ्या योजनामुळे महिला लहानपणापासून आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि व्यवसायिक समृद्ध होवू शकते या योजनेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहे.

- कुटुंबामध्ये जन्माला आलेल्या मुलीबद्दल आणि तिच्या आई बद्दल समाजात रूढ असलेल्या नकारात्मक भूमिकेत बदल घडवून आणणे.
- मुलींची शाळेमध्ये पटसंख्या वाढविणे आणि मधुनच शाळा सोडण्याची वृत्ती कमी करण्याचा प्रयत्न करणे.
- मुलींचे अल्पवयातच लग्न करून देण्यापासून परावृत करणे
- स्वतःचे उत्पन्न वाढविण्यासाठी मुलीने हाती घेतलेल्या उद्योगास अर्थसहाय्य करणे.

**२. शासकीय महिला वसतीगृह :** 18 ते 40 वर्ष वयोपर्यंतच्या निराधार, निरक्षित, परितक्त्या कुमारीमाता, संकटावरत अत्याचाराला बळी पडलेल्या महिलांना संरक्षण व मुलभूत सुविधा पुरवून त्यांचे नोकरी, व्यवसाय आणि विवाह यामार्ग पुनर्वसन करण्याकरिता शासनामार्फत 26 जिल्ह्यात एकुण 20 महिला वसतीगृहे कार्यरत आहेत. गरजू महिलांना दरमहा रु 250/- तिच्यावर अवलंबून असलेल्या बालकास 150/- दुसऱ्या मुलास 100/- अनुदान देण्यात येते.

या योजनेमुळे महिलांची आर्थिक परिस्थिती सक्षम होण्यास मदत होते. आथिक स्थिती समृध्द करुनही महिला समाजात ताठ मानेने जगू शकले.

**3. महिला मंडळांना सहाय्यक अनुदान:** नोंदिणीकृत स्वयंसेवी संस्थामार्फत महिला प्रशिक्षण केंद्राद्वारा आर्थिकदृष्टया मागास कुटुंबातील महिलेस टंकलेखन, भरतकाम, खाद्य पदार्थ बनविणे, रेडिओ, टीव्ही दुरुस्ती, शिवणकला इ. चे व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येते. जेणे करुन महिला प्रशिक्षण पूर्ण करुन त्याचे आर्थिकदृ ष्टया पुनर्वसन करु शकतील. यासाठी महिला मंडळांना अनावर्ती रु. 28500/- 6 महिन्याच्या एका प्रशिक्षण सत्रासाठी रु. 21500/- या प्रमाणे वार्षिक रु. 43000/- अनुदान देण्यात येते. प्रशिक्षण काळात महिलेस रु. 75/- महा विद्यावेतन देण्यात येते. प्रशिक्षण 6 महिन्याचे असते.

**4. स्वंयरोजगारासाठी महिलांना व्यक्तीगत अनुदान:** निराधार, निराश्रित, परितक्त्या, विधवा नैतिकदृष्टया संकटात सापडलेल्या आर्थिकदृष्टया मागास महिलेस स्वतःच्या कुटूंबास आर्थिक हातभार लावण्यासाठी खाद्यपदार्थ बनवून विकणे, फळे भाजीपाला विक्री ई. स्वरूपाचा छोटा व्यवसाय करण्यासाठी महिलेस 500 रु. अनुदान एकदाच देण्यात येते.

**5. अनाथ मुलींच्या विवाहासाठी अर्थसहाय्य:** शासकीय व स्वयंसेवी संस्थांची आधार गृहे, महिला वसतीगृहे व सुधारित माहेर योजने अंतर्गत असलेल्या संस्था मार्फत अनाथ मुलींच्या विवाहासाठी रु. १५०००/- अनुदान शासनामार्फत दिले जाते. त्यापैकी रु. १००००/- राष्ट्रीयकृत बँकेत गुंतविण्यात येते. व ५०००/- संसार उपयोगी साहित्य घेण्यात येते.

**6. हुंडा दक्षता समिती:** हुंदा पध्दतीस आळा घालण्यासाठी चर्चासत्रे, शिबीरे यातून प्रचार कार्य केले

जाते. या कार्यासाठी समितीला 3000/- अनुदान दिले जाते.

**7. महिला व बालकल्याण समिती:** सर्व जिल्हा परिषदांमध्ये महिला व बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी महिला व बालकल्याण समित्यांची स्थापना करण्यात आलेली आहे. समितीद्वारे 24 महिला व बाल विकास योजना राबविल्या जातात. 5 से 10 टक्के निधी जिल्हा परिषद उर्वरित निधी शासन देते.

**8. प्रायव्हेट प्रोजेक्ट:** नैतीक दृष्टया संकटांत सापडलेल्या, वेश्याव्यवसायातून पोलिसांनी सुटका केलेल्या, लालबत्ती विभागातील स्त्रिया व मुलींचे स्वयंसेवी संस्थाच्या माध्यमातून संगोपन, शिक्षण, प्रशिक्षण देऊन पुनर्वसन करण्यासाठी केंद्र शासनामार्फत पायलट प्रोजेक्ट हि योजना कार्यान्वित केली जाते. या योजनेसाठी 1 लाख अनुदान एकदाच देण्यात येते.

**स्त्री सबलीकरणासाठी भारत सरकारने वेगवेगळे कायदे तयार केले आहेत:**

**1. महिलांच्या कल्याणासंबंधी विविध कायदे:**

- घरगुती हिंसाचार प्रतिबंध अधिनियम 2006
- हुडबंदी कायदा १९६१
- अनैतिक व्यापार अधिनियम १९५६
- सतीप्रथा निवारण कायदा 1987
- अनैतिक व्यापार अधिनियम १९६१

**महिलांच्या विकासाबाबतचे सामाजिक कायदे :**

- हिंदू विवाह अधिनियम 1955
- हिंदू वारसा हक्क कायदा 1956
- कुटुंब न्यायालय अधिनियम 1984
- भारतीय घटस्फोट कायदा १९६९
- बालविवाह नियंत्रण कायदा 1920

**काही महत्वपूर्ण कायदे:**

- प्रसुती सुधार कायदा 1961
- संरक्षण कायदा 1993
- आरोग्यसखी कायदा 1997
- बालन्यायालय कायदा 2000
- प्राथमिक शिक्षण कायदा 2009

अशा प्रकारे भारतात कायद्याच्या माध्यमातून स्त्रियांना प्राप्त झालेले अधिकार शासन स्तरावरील विशेष प्रयत्न आणि त्यांच्या विषयी असलेली जाणीव जागृती यामुळे भारतीय स्त्रियांच्या जीवनात बदल होतांना दिसत आहेत.

**निष्कर्ष :**

आज सर्वच क्षेत्रात स्त्रिया हया पुरुषाच्या तुलनेत कुठेच कमी नाहीत. प्राचीन काळापासून स्त्रियांना दुय्यम वागणुक देण्यात आली आहे. त्यामुळे स्त्रियांना अनेक अधिकारापासून, हक्कापासून वंचित रहावे लागले. परंतू आज स्त्रियांच्या हक्कासंबंधी वेगवेगळे कायदे करण्यात आलेले आहेत. तसेच अनेक योजना राबवण्यात येत आहे. यांचा फायदाही अनेक स्त्रियांना झालेला आहे. परंतु ज्या प्रमाणात यांची अंबलबजावणी व्हायला पाहिजे त्या प्रमाणात होत नाही. बोटावर मोजण्याइतक्या स्त्रियांना याचा फायदा झालेला दिसून येतो. यासाठी महिलाविषयक कायद्याची योजनांची माहिती महिलांपर्यंत पोहचणे. त्याचा प्रचार सर्वस्तरातील महिला पर्यंत करणे गरजेचे आहे.

**संदर्भ सूची:**

1. भारताचे संविधान शिल्पकार – डॉ. बाबासाहेब आंबेडकर
2. महिलांच्या विकासाकरिता सरकारी योजना - डॉ. देशमुख एम.एस.
3. महिला सक्षमीकरण- मीनाक्षी निशांत सिंह
4. महिला सबलीकरण स्वरुप समस्या - डॉ.शुभांगी गोटे
5. महिलांचे सबलीकरण आणि शेतकरी महिला आघाडीचे योगदान – डॉ. सौ. नंदिनी तडकलक